**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### खेड तालुका शिक्षण प्रसाराम मंडळ: पुतळा अनावरण आणि नूतन इमारत भूमिपूजन

पुढारी

# आप्पासाहेब सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुक्याचे माजी आमदार, सहकारमहर्षी स्व. साहेबराव तथा आप्पासाहेब सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा अनावरण सोहळा ज्येष्ठ नेते, खासदार शरद पवार यांच्या हस्ते शनिवारी(दि. २५) थाटामाटात झाला.

खेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाच्या चांडोली येथील पेट्रोलपंप व सीएनजी पंपाच्या आवारात आप्पासाहेब सातकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे. या वेळी राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, राज्यमंत्री दत्ता भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार दिलीप मोहिते पाटील, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष रमेश थोरात, जिल्ह्यातील विविध पक्षांचे पदाधिकारी, भाजपचे जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख, शिवसेनेचे जिल्हा परिषद सदस्य बाबाजी काळे आदी मान्यवर उपस्थित होते. राज्य सहकारी संघाचे उपाध्यक्ष तसेच जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष व खेड तालुका खरेदी-विक्री संघाचे संचालक हिरामण सातकर, संचालक व खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विनायक घुमटकर, अध्यक्ष राजाराम लोखंडे, उपाध्यक्ष नामदेव कलवडे, आनंदा काळे, विलास कातोरे, बाळासाहेब राळे, संतोष आवटे, चेतन बोत्रे, यशवंत पिंगळे, विकास गोपाळे, रंगनाथ आरुडे, कैलास लिंभोरे, मंगल कोतवाल, शामल देवदरे, कार्यकारी संचालक प्रतापराव टाकळकर, राजगुरुनगर सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष, विद्यमान संचालक प्रतापराव आहेर व सहकारी, श्री सिध्देश्वर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे अध्यक्ष खंडेराव थिगळे व सर्व संचालक मंडळाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



आप्पासाहेब सातकर यांच्या पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी उपस्थित मान्यवर.

My Gramin Edition
Dec 26, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# जनशक्तीपुढे हुकूमशाही टिकत नाही

## शरद पवारांची मोदी सरकारवर टीका, राजगुरुनगरला विविध कार्यक्रम

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

लोकशाही मार्गाने सत्तेत आल्यावर हुकूमशाही अंमलात आणली तर जनशक्ती एकवटते आणि अशा सत्तेला पायउतार व्हावे लागते, असा जगाचा इतिहास आहे. भारतात सध्याच्या सरकारने शेतकऱ्यांना अडचणीत आणणारे कायदे आणले, त्यावर कोणत्याही सभागृहात किंवा शेतकरी प्रतिनिधींशी चर्चा केली नाही, परिणामी शेतकरी एकवटले, वर्षभर लढा दिला, अनेकाना प्राण गमवावे लागले. त्यानंतर ३ कृषी कायदे मागे घ्यावे लागण्याची नामुष्की सरकारवर आली, अशी टीका खासदार शरद पवार यांनी केंद्रातील मोदी सरकारवर राजगुरुनगर येथे केली.

खेड तालुक्याचे माजी आमदार स्व. साहेबराव तथा आप्पासाहेब सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण, जीवनपट चित्रफीत प्रकाशन तसेच हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन खासदार पवार यांच्या हस्ते शनिवारी (दि. २५) पार पडले. त्यानंतर हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्यात पवार बोलत होते. खेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



हुतात्मा राजगुरू विद्यालयात उपस्थितांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठ नेते शरद पवार.

गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, राज्यमंत्री दत्ता भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार दिलीप मोहिते, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष रमेश थोरात, संचालक संजय काळे, खेड बाजार समिती सभापती विनायक घुमटकर, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, पंचायत समिती सभापती अरुण चौधरी, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे, नानासाहेब टाकळकर, हरिभाऊ सांडभोर, कैलास सांडभोर, अनिलबाबा राक्षे, राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष रामदास मोरे आदी या वेळी उपस्थित होते.

खासदार पवार पुढे म्हणाले, देशातील शेतकऱ्याची सध्याची अवस्था वाईट आहे. ही अवस्था बदलायची असेल तर त्याची आर्थिक गुंतवणूक क्षमता वाढवली पाहिजे. आपण संरक्षण मंत्री असताना म्हणूनच ७१ हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले होते. पुण्यात जिल्हा बँकेच्या माध्यमातून १८०० कोटी रुपये शून्य टक्के दराने दिले जातात. याकडे केंद्राने लक्ष द्यावे, असे पवार यांनी सांगितले.

गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांचे ही भाषण झाले. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष हिरामण सातकर यांनी सर्वांचे स्वागत केले. डॉ. प्रकाश चौधरी यांनी सूत्रसंचालन केले.

### सातकर सहकारातील मोठे नेते : पवार

खेडचे माजी आमदार स्व. साहेबराव सातकर सहकारातील मोठे व ज्येष्ठ नेते होते. ज्या काळात शेतकऱ्यांच्या पारंपरिक साधनातून बाहेर काढून नव्या युगात आणायचे होते. त्या काळात सहकार चळवळीचे जाळे तयार करण्यासाठी साहेबराव सातकरांनी दिशादर्शक काम केले. त्यांच्या पुढच्या पिढीने त्यांचा आदर्श पुढे चालवावा असे खा. शरद पवार यांनी सांगितले.

My Gramin Edition
Dec 26, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

लोकमत



राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या नुतन इमारतीचे भूमीपूजन शरद पवार यांच्या हस्ते झाले यावेळी संस्थेच्या वतीने मानपत्र देऊन त्यांच्या सन्मान करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील समवेत वळसे पाटील.

# चळवळीत सातकर व बुट्टे पाटील यांचे मोलाचे योगदान : शरद पवार

## साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** राज्यात दिमाखात उभ्या असलेल्या सहकार चळवळीमध्ये माजी आमदार कै. साहेबराव सातकर यांचे, तर शैक्षणिक क्षेत्रात माजी आमदार कै. साहेबराव बुट्टे पाटील यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या कार्याचे अनुकरण पुढच्या पिढ्यांनी करणे हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे, असे प्रतिपादन माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी येथे केले.

खेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन व शेतकरी मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार दिलीप मोहिते पाटील, रमेश थोरात, सूर्यकांत पलांडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे, संचालक हिरामण सातकर तसेच रूपाली चाकणकर, प्रताप आहेर, कैलास सांडभोर, डॉ. अनिल खिवंसरा, प्रमोद गानू, हरिभाऊ सांडभोर, बाळासाहेब सांडभोर, बबनराव मांडे, संजय काळे, देवदत्त निकम, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, शिल्पकार सीमा खेडकर आदी उपस्थित होते.

> देशात आणि राज्यात शेतीकडे प्राधान्याने पाहायला पाहिजे. पुणे जिल्हा सहकारी बँक शून्य टक्के व्याजाने शेतकऱ्यांना कर्ज देऊ शकते तर इतर ठिकाणी अशा प्रकारे कर्ज देता येईल का, याचाही विचार व्हायला हवा.
>
> **- शरद पवार, माजी केंद्रीय कृषिमंत्री**

प्रास्ताविकात बोलताना देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, खेड तालुक्याच्या राजकारणामध्ये कै. साहेबराव सातकर आणि कै. नारायणराव पवार या दोन्हींचे स्वतंत्र तत्कालीन गट होते; परंतु राजकीय आरोप आणि प्रत्यारोप दोन्ही गटांनी एकमेकांवर कधीही केले नाही. चासकमान धरणाचे भूमिपूजन, पूर्वीच्या खेडचे राजगुरूनगर हे नामांतर आणि शैक्षणिक क्रांती हे स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांचे चिरंतन स्मृतीकार्य आहे.

याप्रसंगी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, खासदार डॉ. अमोल कोल्हे, हिरामण सातकर यांची भाषणे झाली. कार्यक्रमात 'सहकारमहर्षी' या स्व. साहेबराव सातकर यांच्या जीवनावरील पुस्तकाचे व 'ज्ञानदीप' या वार्षिक अकांचे प्रकाशन शरद पवार यांनी केले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Dec 26, 2021
Powered by: erelego.com

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचा पवारांमुळे विकास

**राजगुरूनगर, दि. २५ (प्रतिनिधी)** - शरद पवार यांच्या माध्यमातून खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थेचा मोठा विकास झाला आहे. खेड तालुका शिक्षण संस्था पवार यांच्या विचारातून माजी आमदार स्व. आप्पासाहेब सातकर यांच्या प्रेरणेतून आमदार स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांनी या शिक्षण संस्थेची स्थापना करून तालुक्यातील गरीब सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली केली. त्यांच्या या उदात्त हेतूमुळे आज या संस्थेचा वटवृक्ष झाला आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, महाविद्यालयाचा शाश्वत पद्धतीने विकास सुरू आहे. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात ५२ टक्के मुली ४८ टक्के मुले अशी सुमारे १० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तालुक्यातील सर्वांना शिक्षण मिळण्यासाठी

## ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील : ५० वर्ग असलेली पाच मजली इमारत उभी राहणार

५० वर्ग असलेली ५ मजली इमारत उभी केली जाणार आहे. केंद्रीय माजी मंत्री शरद पवार यांनी सुरू केलेल्या विविध योजनेतून महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गरीब होतकरू ८७ विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणता आले आहे. सावित्रीबाई फुले, शारदाबाई पवार दत्तात्रय वळसे पाटील, स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या नावाने विविध योजना सुरू आहेत. तालुक्यात मोठी एमआयडीसी झाली त्यात भूमिपुत्रांना रोजगार मिळावा त्याही पुढे या कंपन्यांच्या सामाजिक उत्तर दायित्व निधी (सीएसआर) मिळावा जेणेकरून विद्यार्थ्यांना व्यावसायिक तांत्रिक शिक्षण देता येईल, अशी मागणी शरद पवारांकडे करण्यात आली.

प्रभात Sun, 26 December 2021
https://epaper.eprabhat.net/c/65196116

# जनशक्तीपुढे हुकूमशाही चालत नाही

## राजगुरूनगर येथे शरद पवार यांचे प्रतिपादन

**राजगुरूनगर, दि. २५ (प्रतिनिधी)** - देशात हुकूमशाहीच्या जोरावर तीन कृषी कायदे लादण्यात आले होते. त्या विरोधात आवाज उठवणाऱ्या शेतकऱ्यांवर सत्तेच्या जोरावर अन्याय, अत्याचार केला; मात्र शेतकऱ्यांच्या एकजुटीच्या लढाईमुळे हे कायदे सरकारला मागे घ्यावेत लागले. जनशक्ती महत्त्वाची असते, त्या विरोधात गेलेल्या नेत्याला हुकूमशाही राज्य करता येत नाही, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाध्यक्ष शरद



पवार यांनी राजगुरूनगर येथे केले.

लोकशाहीत कोणताही कायदा करण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधान परिषदेत चर्चा व्हावी लागते. जनमताचा विचार करावा लागतो. मात्र, मोदी सरकारने शेतकरी हिताच्या विरोधात तीन कायदे करून ते अंमलात आणले. त्यामुळे देशातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार होते या विरोधात हरियाणा, पंजाब आदी राज्यांसह देशभरात शेतकऱ्यांनी आंदोलने केली. मोदी सरकारने ती दडपण्याचा प्रयत्न केला; मात्र शेतकऱ्यांच्या एकजुटी पुढे हुकूमशाही सरकारला झुकावे लागले, असे ते म्हणाले.

### जिल्हा बँक करू शकते, मग केंद्र का नाही?

शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणे सरकारचे कर्तव्य आहे. हे समजून ७० हजार कोटींची कर्जमाफी केली. पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेने १८०० कोटी रुपये शून्य टक्के व्याजदराने शेतकऱ्यांना दिले. जिल्हा बँक हे करू शकते तर केंद्र सरकार का करू शकत नाही? शेतकऱ्यांचे अर्थकारण सुधारले पाहिजे भांडवली ताकद त्यांची वाढवणे गरजेचे असून त्यासाठी केंद्रीय पातळीवर निर्णय होणे गरजेचे आहे. मात्र, हुकूमशाही सरकार शेतकरीविरोधी धोरण राबवित असल्याने शेतकऱ्यांचे प्रश्न सुटण्यास विलंब होत आहे.

प्रभात Sun, 26 December 2021
https://epaper.eprabhat.net/c/65195897

# स्वच्छ, पारदर्शक कारभार संस्थेत हवा

**शरद पवार : राजगुरूनगर येथे स्व. सातकर, स्व. बुट्टे पाटील यांच्या आठवणींना उजाळा**

**राजगुरूनगर, दि. २५ (प्रतिनिधी) -** माजी आमदार स्व. आप्पासाहेब सातकर यांचा पुतळा नुसता उभा करून चालणार नाही तर त्यांचा स्वच्छ कारभार, समाजोपयोगी विचार अवगत करून संस्थेत स्वच्छ व पारदर्शकता ठेवून कारभार केला पाहिजे, अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त करून माजी आमदार स्व. आप्पासाहेब सातकर, स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या आठवणींना उजाळा दिला.

सहकारमहर्षी साहेबराव तथा आप्पासाहेब सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे महामार्गावरील एचपी पेट्रोल जवळ अनावरण, सहकारमहर्षी आप्पासाहेब सातकर यांच्यावरील सहकारमहर्षी या पुस्तकाचे प्रकाशन आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन समारंभ शरद पवार यांच्या हस्ते शनिवारी (दि.२५) राजगुरूनगर येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, खेडचे आमदार दिलीप मोहिते, माजी आमदार राम कांडगे, मदन बाफना, जिल्हा बँकेचे अध्यक्ष रमेश थोरात, सूर्यकांत पलांडे, जिल्हा अध्यक्ष प्रदीप गारटकर, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, सचिव हरिभाऊ सांडभोर, जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष हिरामण सातकर, खरेदी-विक्री संघाचे राजाराम लोखंडे, पंचायत समिती सभापती अरुण चौधरी, उपसभापती वैशाली गव्हाणे यांच्यासह शिक्षण प्रसारक मंडळ व खरेदी-विक्री संघ यांचे सहकारमहर्षी आप्पासाहेब सातकर यांच्यावरील सहकारमहर्षी या पुस्तकाचे प्रकाशन शरद पवार यांच्या हस्ते झाले.





**राजगुरूनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या पाच मजली इमारतीचे भूमिपूजन माजी केंद्रीयमंत्री शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. तर दुसऱ्या छयाचित्रात माजी आमदार सहकारमहर्षी स्व. आप्पासाहेब सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.**

> “ शरद पवार यांच्या माध्यमातून खेड, आंबेगाव, जुन्नर, मावळ तालुक्याचा सर्वांगीण विकास झाला. शेती समृद्ध केली. चाकण येथे एमआयडीसी झाली. सरकारला कोट्यवधींचा रिव्हेन्यू मिळत आहे; मात्र येथील देशी-विदेशी कंपन्यांमध्ये स्थानिक बेरोजगारांना काम मिळत नाही ही शोकांतिका आहे. या कंपन्यांमध्ये स्थानिकांना नोकऱ्या मिळणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने तरुण तरुणींनी तांत्रिक व्यावसायिक शिक्षणावर भर दिला पाहिजे. रोजंदारीचा प्रश्न सोडवण्यासाठी तरुणांनी आपल्यात बदल केला पाहिजे.
>
> – **दिलीप वळसे पाटील**, गृहमंत्री

## ‘स्व. बुट्टे पाटलांनी ‘हे’ कार्य केले’

**राजगुरूनगर, दि. २५ (प्रतिनिधी)** - माजी आमदार स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांचे तालुक्यात योगदान काय? याबाबत तालुक्यात मध्यंतरी विषय झाला होता. त्याला शरद पवार यांच्या उपस्थितीत संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी उत्तर दिले. योगदानावर आक्षेप हा विषय मुळात तालुक्यातील जनतेला आवडलेले नाही.

देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांनी केलेले कार्य, चासकमान धरणाचे भूमिपूजन करून तालुक्यातील जनतेला मुबलक पाणी उपलब्ध केले. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापन करून हुतात्मा राजगुरू महाविद्यालय सुरू करून उच्च शिक्षणाच्या सर्व घटकातील, गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी निर्माण केली. खेडचे नाव राजगुरूनगर करून देशाला सांगितले हे तेच गाव ज्या गावात थोर क्रांतिकारक हुतात्मा राजगुरू जन्माला आले. आपणास देऊ केलेल्या सत्तेतल्या सर्व पदांना नकार देत मैत्री निर्माण केली सत्तेतल्या पदापेक्षा जास्त स्थान दिले. सदा सर्वदा योग तुझा घडावा अशी प्रार्थना केली, असे त्यांनी नमूद केले.

प्रभात Sun, 26 December 2021
https://epaper.eprabhat.net/c/65196166

# जनशक्ती विरोधात गेल्याने केंद्राकडून कृषी कायदे मागे

## ज्येष्ठ नेते शरद पवार यांची राजगुरुनगर येथे टीका

राजगुरुनगर, ता. २५ : "लोकशाहीत संसदेत चर्चा न करता गडबडीत कायदे मंजूर करणे, ही एक प्रकारची हुकूमशाहीच असून, कृषी कायदे मंजूर करताना केंद्र सरकारने तसा प्रयत्न केला. तसेच, लोकशाहीत जनशक्तीही महत्त्वाची असून, जनशक्ती विरोधात गेली; तर राज्यकर्त्याला राज्य करता येत नाही. म्हणूनच सरकारला कायदे मागे घ्यावे लागले," असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी राजगुरुनगर (ता. खेड) केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ व खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ यांच्या वतीने आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील हे होते. पवार म्हणाले, "कायदा मंजूर होण्याआधी चर्चा झाली, तर योग्य गोष्टींना पाठिंबा देता येतो. कमतरता असतील; तर दुरुस्ती करता येते. मात्र, तीन कृषी कायदे मंजूर होताना शेतीविषयक, शेतकरीविषयक आणि शेतीच्या व्यापारविषयक अनेक काळजी करण्यासारख्या बाबी होत्या. तरी गडबडीत कायदे मंजूर केले गेले. त्यामुळे उत्तर भारतातील शेतकरी ऊन, पाऊस व थंडीची पर्वा न करता शेतकरी आंदोलनास बसले. सरकारने त्यांच्याकडे ढुंकून पाहिले नाही."

वळसे पाटील म्हणाले, "महाराष्ट्राने मंजूर केलेल्या शक्ती कायद्यामुळे महिला मुलींना चांगले संरक्षण मिळणार आहे. यामध्ये मृत्युदंडाचीही तरतूद आहे. तरुणांनी सोशल मीडियातून ज्ञान घ्यावे, पण नको ती माहिती घेऊ नये. मीडिया वापरताना स्वतःला बंधने घालून घेतली पाहिजेत."



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजन करताना ज्येष्ठ नेते शरद पवार.

**दै. सकाळ**

HRM

# शेतकऱ्यांची गुंतवणूक ताकद वाढवावी

## ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे मत; साहेबराव सातकर यांच्या पुतळ्याचे अनावरण





राजगुरुनगर (ता. खेड) : सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांचा पूर्णाकृती पुतळा. (दुसऱ्या छायाचित्रात) सातकर यांच्या पुतळ्याचे रिमोटद्वारे अनावरण करताना ज्येष्ठ नेते शरद पवार. यावेळी उपस्थित मान्यवर.

राजगुरुनगर, ता. २५ : "शेती परवडेल असा धंदा होण्याची गरज आहे. शेतीचे अर्थकारण सुधारले पाहिजे. शेतकरी सुधारण्यासाठी त्याची गुंतवणुकीची ताकद वाढविली पाहिजे. पुणे जिल्हा बँक शेतकऱ्यांना शून्य टक्के दराने कर्ज देऊ शकते, तर केंद्र सरकार का देऊ शकत नाही?" असा सवाल ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केला.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ व खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ यांच्या वतीने आयोजित सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण राजगुरुनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित इमारतीच्या भूमिपूजन आणि खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या खेड तालुका कार्यालयाचे उद्घाटन पवार यांच्या हस्ते शनिवारी (ता. २५) झाले. यानिमित्त आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील हे होते. या वेळी राज्यमंत्री दत्तात्रेय भरणे, खासदार कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार दिलीप मोहिते पाटील, रूपाली चाकणकर, रमेश थोरात, मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे, उपाध्यक्ष नामदेव कलवडे, संचालक हिरामण सातकर, तालुकाध्यक्ष कैलास सांडभोर, सभापती अरुण चौधरी, बाजार समितीचे सभापती विनायक घुमटकर आदी उपस्थित होते. प्रकाश चौधरी यांनी सूत्रसंचालन केले.

> "राज्यातील सहकारी चळवळीमध्ये यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील यांच्यानंतरच्या दुसऱ्या पिढीतील साहेबराव सातकर हे महत्त्वाचे नेते होते. तर, साहेबराव बुट्टे पाटील यांनी शिक्षणाचे दालन उभे करून सामान्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली.
>
> **- शरद पवार,** ज्येष्ठ नेते

वळसे पाटील म्हणाले, "खेड, आंबेगाव व जुन्नर तालुक्यात पवारांनी धरणांची साखळी उभारल्यामुळे येथील शेती समृद्ध झाली. तर, एमआयडीसी उभारल्यामुळे या भागातील आर्थिक स्तर उंचावला. त्याचा लाभ घेण्यासाठी स्थानिक तरुणांनी तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण घेतले पाहिजे. पान ८ वर »

**दै. सकाळ**

HRM

वर्ष : १४१ Regd.No. PCW/002/2021-2023-S.P.College Post-RNI No. [illegible]

केसरी

राष्ट्रीय ठेवा

# सहकार व शैक्षणिक चळवळीत सातकर व बुट्टे पाटील यांचे कार्य उल्लेखनीय : पवार





राजगुरुनगर येथे सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांच्या हस्ते शनिवारी झाले. यावेळी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील व अन्य उपस्थित होते.

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** राज्यात दिमाखात उभ्या असलेल्या सहकार चळवळीमध्ये माजी आमदार कै. साहेबराव सातकर यांचे, तर शैक्षणिक क्षेत्रात माजी आमदार कै. साहेबराव बुट्टे पाटील यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या कार्याचे अनुकरण पुढच्या पिढ्यांनी करणे हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे, असे प्रतिपादन माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी सांगितले.

खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन व शेतकरी मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव, आमदार दिलीप मोहिते पाटील, माजी आमदार रमेश थोरात, सूर्यकांत पलांडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे, संचालक हिरामण सातकर, रुपाली चाकणकर, प्रताप आहेर, कैलास सांडभोर, डॉ. अनिल खिवंसरा, प्रमोद गानू, हरिभाऊ सांडभोर, बाळासाहेब सांडभोर, बबनराव मांडे, संजय काळे, देवदत्त निकम, मुरलीधर खांगटे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, शिल्पकार सीमा खेडकर उपस्थित होते.

पवार म्हणाले, शेती उद्योग बेभरवशाचा झाला आहे. लोकशाहीत कोणत्याही कायद्यावर सविस्तर चर्चा व्हावी, यासाठी राज्यसभा, विधानसभा आणि लोकसभा असते; परंतु केवळ पंधरा मिनिटांची चर्चा असे शेतकऱ्यांच्या विरोधात तीन कायदे आणले गेले. नाईलाजाने बळीराजाला वर्षभर आंदोलन करावे लागले. अखेर जनशक्ती पुढे माघार घेत केंद्र सरकारला हे तीनही कायदे मागे घ्यावे लागले; परंतु तोपर्यंत अनेक शेतकऱ्यांना तुरुंगवास, अन्याय आणि लखिमपूर सारख्या घटनेत काही शेतकऱ्यांना आपले प्राणही गमवावे लागले लोकशाही देशात असे प्रकार अपेक्षित नाहीत.

देशात आणि राज्यात शेतीकडे प्राधान्याने पाहायला पाहिजे. पुणे जिल्हा सहकारी बँक शून्य टक्के व्याजाने शेतकऱ्यांना कर्ज देऊ शकते, तर इतर ठिकाणी अशा प्रकारे कर्ज देता येईल का, याचाही विचार व्हायला हवा. याप्रसंगी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, खासदार डॉ. अमोल कोल्हे, हिरामण सातकर यांची भाषणे झाली.

> प्रास्ताविकात देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले , खेड तालुक्याच्या राजकारणामध्ये कै. साहेबराव सातकर आणि कै. नारायणराव पवार या दोन्हींचे स्वतंत्र तात्कालीन गट होते. परंतु राजकीय आरोप आणि प्रत्यारोप दोन्ही गटांनी एकमेकांवर कधीही केले नाही. केवळ तालुक्याच्या विकासाच्या राजकारणातच हे दोन्ही गट काम करत होते. स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या अध्यक्षपदाच्या जागेवर स्व. साहेबराव सातकर यांनी मला बसवले. उपेक्षित, वंचित आणि मागास घटकांसाठी सर्वसमावेशक काम करा, असा संदेश पवार साहेबांनी दिला. त्याच आदर्शावर कायम राहून संस्थेचा विकास शाश्वत पद्धतीने सुरु आहे. चासकमान धरणाचे भूमिपूजन, पूर्वीच्या खेडचे राजगुरूनगर हे नामांतर आणि शैक्षणिक क्रांती हे स्व. साहेबरावजी बुट्टे पाटील यांचे चिरंतन स्मृतिकार्य आहे. तर विविध राजकीय पदांना नम्र नकार हा त्यांचा त्याग आहे.

कार्यक्रमात 'सहकारमहर्षि ' या स्व. साहेबराव सातकर यांच्या जीवनावरील पुस्तकाचे व महाविद्यालयाच्या 'ज्ञानदीप' या वार्षिक अंकाचे प्रकाशन पवार यांनी केले. कार्यक्रमापूर्वी कै. साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण व महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन पवार यांच्या हस्ते झाले. डॉ. प्रकाश चौधरी यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

गांवकरी

गांवकरी www.gavakari.in

अहमदनगर - पुणे

नाशिक, रविवार,
दि. २६ डिसेंबर २०२१

# सहकार व शैक्षणिक चळवळीत सातकर व बुट्टे पाटील यांचे कार्य उल्लेखनिय : शरद पवार

राजगुरुनगर
गांवकरी प्रतिनिधी

राज्यात दिमाखात उभ्या असलेल्या सहकार चळवळीमध्ये माजी आमदार कै. साहेबराव सातकर यांचे तर शैक्षणिक क्षेत्रात माजी आमदार कै. साहेबराव बुट्टे पाटील यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या कार्याचे अनुकरण पुढच्या पिढ्यांनी करणे हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे. असे प्रतिपादन माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी येथे केले.

खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत सहकारमहर्षी साहेबरावजी सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन व शेतकरी मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते.






यावेळी व्यासपीठावर गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार दिलीप मोहिते पाटील, माजी आमदार रमेश थोरात, सूर्यकांत पलांडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ड. देवेंद्र बुट्टे पाटील, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे, संचालक हिरामण सातकर तसेच रुपाली चाकणकर, प्रताप आहेर, कैलास सांडभोर, डॉ. अनिल खिवंसरा, प्रमोद गानू, हरिभाऊ सांडभोर, बाळासाहेब सांडभोर, बबनराव मांडे, संजय काळे, देवदत्त निकम, मुरलीधर खांगटे ,प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, शिल्पकार सिमा खेडकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना पवार म्हणाले, शेतीचा उद्योग हा बेभरवशाचा झाला आहे. आणि केंद्र सरकारने केलेले अडचणीचे कायदे यामुळे शेतकरी अधिकच संकटात सापडला आहे. लोकशाहीत कोणत्याही कायद्यावर सविस्तर चर्चा व्हावी, याचसाठी राज्यसभा, विधानसभा आणि लोकसभा असते. परंतु केवळ पंधरा मिनिटांची चर्चा करून एकतर्फी असे शेतकऱ्यांच्या विरोधात तीन कायदे आणले गेले आणि त्यामुळे नाईलाजाने बळीराजाला वर्षभर दिल्लीच्या सीमांवर आंदोलन करावे लागले. अखेर जनशक्ती पुढे माघार घेत केंद्र सरकारला हे तीनही कायदे मागे घ्यावे लागले. परंतु तोपर्यंत अनेक शेतकऱ्यांना तुरुंगवास, अन्याय आणि लखिमपूर सारख्या घटनेत काही शेतकऱ्यांना आपले प्राणही गमवावे लागले लोकशाही देशात असे प्रकार अपेक्षित नाहीत. देशात आणि राज्यात शेतीकडे प्राधान्याने पाहायला पाहिजे. पुणे जिल्हा सहकारी बँक शुन्य टक्के व्याजाने शेतक-यांना कर्ज देऊ शकते तर इतर ठिकाणी अशा प्रकारे कर्ज देता येईल का, याचाही विचार व्हायला हवा. प्रास्ताविकात बोलताना देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, खेड तालुक्याच्या राजकारणामध्ये कै. साहेबराव सातकर आणि कै. नारायणराव पवार या दोन्हींचे स्वतंत्र तात्कालीन गट होते. परंतु राजकीय आरोप आणि प्रत्यारोप दोन्ही गटांनी एकमेकांवर कधीही केले नाही. केवळ तालुक्याच्या विकासाच्या राजकारणातच हे दोन्ही गट काम करत होते. स्व. साहेबरावजी बुट्टे पाटील यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या अध्यक्षपदाच्या जागेवर स्व. साहेबराव सातकर यांनी मला हाताला धरून बसवले. आणि उपेक्षित, वंचित आणि मागासघटकांसाठी सर्वसमावेशक काम करा असा संदेश पवार साहेबांनी दिला. त्याच आदर्शावर कायम राहून संस्थेचा विकास शाश्वत पद्धतीने सुरू आहे. चासकमान धरणाचे भूमीपूजन, पूर्वीच्या खेडचे राजगुरूनगर हे नामांतर आणि शैक्षणिक क्रांती हे स्व. साहेबरावजी बुट्टे पाटील यांचे चिरंतन स्मृतीकार्य आहे. तर विविध राजकीय पदांना नम्र नकार हा त्यांचा त्याग आहे. असेही ते म्हणाले.

याप्रसंगी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील,खासदार डॉ. अमोल कोल्हे, हिरामण सातकर यांची भाषणे झाली. कार्यक्रमात 'सहकारमहर्षि ' या स्व. साहेबराव सातकर यांच्या जीवनावरील पुस्तकाचे व महाविद्यालयाच्या ' ज्ञानदीप ' या वार्षिक अकांचे प्रकाशन शरद पवार यांनी केले. कार्यक्रमापूर्वी कै. साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण व महाविद्यालयाच्या नुतन इमारतीचे भूमिपूजन शरद पवार यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन डॉ. प्रकाश चौधरी यांनी केले.

महाराष्ट्र टाइम्स । पुणे । रविवार, २६ डिसेंबर २०२१ ५

# शेतकऱ्यांच्या लढ्यापुढे केंद्र नमले

## माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांचे मत

**म. टा. वृत्तसेवा,** राजगुरुनगर



शरद पवार

'हुकूमशाही पद्धतीने केंद्र सरकारने शेतकऱ्यांविरोधात जाचक कायदे आणले. मात्र, शेतकऱ्यांच्या लढ्यापुढे त्यांना नमते घ्यावे लागले. सत्तेच्या विरोधात जनशक्ती गेल्यास फार काळ राज्य करता येणार नाही, याची जाणीव होताच केंद्र सरकारने कायदे मागे घेतले,' असे प्रतिपादन माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी राजगुरुनगर येथे केले.

सहकार महर्षी साहेबराव सातकर यांच्या पुतळ्याचे अनावरण व हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचा भूमिपूजन समारंभ पवार यांच्या उपस्थितीत पार पडला. या वेळी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, बांधकाम राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार दिलीप मोहिते, रमेश थोरात, संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, हिरामण सातकर आदी उपस्थित होते.

या वेळी साहेबराव सातकर यांच्यावरील 'सहकार महर्षी' पुस्तकाचे प्रकाशन शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

पवार म्हणाले, 'देशातील शेतकरी आज अडचणीत आहे. केंद्राचे तिन्ही कृषी कायदे काळजी करण्यासारखे होते. चर्चा न करताच ते पास केले गेले. लगेच अंमलबजावणी सुरू केली. ही हुकूमशाहीच आहे. शेतकऱ्यांच्या अंगावर गाड्या घालणे, हत्या करणे, तुरुंगात टाकणे हा अत्याचार योग्य नाही. आम्ही शेतकऱ्यांचे ७१ हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले, शून्य टक्के व्याजाने कर्ज दिले. शेतकऱ्यांचे अर्थकारण सुधारणे ही देशाची गरज आहे.'

'राज्य सरकारने महिला अत्याचारविरोधी 'शक्ती' कायदा मंजूर करून महिलांना न्याय दिला आहे. मुलांनी स्वतःवर बंधन आणून सोशल मीडियापासून दूर रहाण्याचा प्रयत्न करावा. अमली पदार्थांपासून मुलांनी दूर रहाण्यासाठी पालकांनी लक्ष ठेवावे,' असे दिलीप वळसे पाटील यांनी सांगितले.

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

पुणे,
. २७ डिसेंबर २०२१

ग्रामीण पुणे

६

# सातकर व बुट्टे पाटील यांचे कार्य उल्लेखनिय : शरद पवार

राजगुरुनगर (दै. संध्या) :

राज्यात दिमाखात उभ्या असलेल्या सहकार चळवळीमध्ये माजी आमदार कै. साहेबराव सातकर यांचे तर शैक्षणिक क्षेत्रात माजी आमदार कै. साहेबराव बुट्टे पाटील यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या कार्यांचे अनुकरण पुढच्या पिढ्यांनी करणे हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे. असे प्रतिपादन माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी येथे केले. खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ आणि खेड



तालुका शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत सहकारमहर्षी साहेबरावजी सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विस्तारित नूतन इमारतीचे भूमिपूजन व शेतकरी मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार दिलीप मोहिते पाटील, माजी आमदार रमेश थोरात, सूर्यकांत पलांडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ड. देवेंद्र बुट्टे पाटील, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे, संचालक हिरामण सातकर तसेच रुपाली चाकणकर, प्रताप आहेर, कैलास सांडभोर, डॉ. अनिल खिवंसरा, प्रमोद गानू, हरिभाऊ सांडभोर, बाळासाहेब सांडभोर, बबनराव मांडे, संजय काळे, देवदत्त निकम, मुरलीधर खांगटे ,प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, शिल्पकार सिमा खेडकर आदी उपस्थित होते. पुढे बोलताना पवार म्हणाले, शेतीचा उद्योग हा बेभरवशाचा झाला आहे. आणि केंद्र सरकारने केलेले अडचणीचे कायदे यामुळे शेतकरी अधिकच संकटात सापडला आहे. लोकशाहीत कोणत्याही कायद्यावर सविस्तर चर्चा व्हावी, याचसाठी राज्यसभा, विधानसभा आणि लोकसभा असते. परंतु केवळ पंधरा मिनिटांची चर्चा करून एकतर्फी असे शेतकऱ्यांच्या विरोधात तीन कायदे आणले गेले आणि त्यामुळे नाईलाजाने बळीराजाला वर्षभर दिल्लीच्या सीमांवर आंदोलन करावे लागले.

पिंपरी ग्रामीण

पुणे | मंगळवार,

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचे शरद पवार यांच्या हस्ते उद्घाटन

## आजी-माजी लोकप्रतिनिधींची उपस्थिती

| राजगुरूनगर : प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्या हस्ते सहकार महर्षी आप्पासाहेब तथा साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण शनिवारी (दि.२५) करण्यात आले. त्याचप्रमाणे राजगुरुनगर येथे खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचे भूमीपूजन पवार यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळीगृहमंत्री दिलीप वळसे पाटील, मंत्री दत्तामामा भरणे, खासदार डॉ.अमोल कोल्हे,आमदार दिलीप मोहिते, शिवसेनेचे उपनेते माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील, देवेंद्र बुट्टे पाटील आदी उपस्थित होते.

खेड तालुक्याच्या विविध कामांच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी शरद पवार दौऱ्यावर आले होते. चाकण येथे खासगी शाळेच्या इमारतीच्या उद्घाटनासह,शिरोली येथील खासदार डॉ.अमोल कोल्हे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन, खरेदी विक्री संघाच्या पेट्रोल पंपाच्या आवारातील सहकारी महर्षी माजी आमदार साहेबराव तथा आप्पासाहेब सातकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे आणि सीएनजी पंपाच्या शुभारंभ प्रसंगी हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजीत शेतकरी मेळाव्याला पवार यांनी संबोधित केले.

यावेळी हिरामण सातकर, संस्था अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील, खासदार डॉ.अमोल कोल्हे, गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी विचार व्यक्त केले. यावेळी राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, शिवसेना उपनेते माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील,आमदार दिलीप मोहिते पाटील, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, माजी आमदार अॅड. राम काडंगे, सुर्यकांत पलांडे, रमेश थोरात,नानासाहेब टाकळकर, हरिभाऊ सांडभोर, राजाराम लोखंडे,नामदेव कलवडे आदीउपस्थित होते. सुत्रसंचालन प्रा.प्रकाश चौधरी यांनी तर आभार प्राचार्य व्ही.डी.कुलकर्णी यांनी मानले.

कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयीन ज्ञानदिप वार्षीक अंकाचे आणि दिवगंत सहकार महर्षी आप्पासाहेब सातकर यांच्या जीवनकार्याच्या पुस्तिकेचे प्रकाशन शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. सहकार महर्षी आप्पासाहेब सातकर यांच्या राजकीय जीवन वाटचालीचा आढावा घेणारी चित्रफित दाखवण्यात आली.

दै. पुण्यनगरी

# शेतकऱ्यांच्या एकजुटीमुळे हुकूमशाही सरकारची माघार



## राजगुरूनगर येथे शेतकरी मेळावा संपन्न

### सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

राजगुरूनगर, दि. २७ (सा. वा.) – सत्तेच्या जोरावर देशात एकाधिकारशाही राबवून भाजप सरकारने तीन कृषी कायदे केले. कोणतीही चर्चा न करताच कायदे करण्यात केले. त्यानंतर त्या विरोधात आवाज उठविणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय, अत्याचार केला. मात्र, शेतकऱ्यांच्या एकजुटीच्या लढाईमुळे हे कायदे हुकूमशाही सरकारला मागे घ्यावे लागले. जनशक्ती विरोधात नेत्याला हुकूमशाही पद्धतीने राज्य करता येत नाही, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष, खासदार शरद पवार यांनी व्यक्त केले.

खेड तालुक्यातील चाकण येथील एका खासगी शाळेचे, शिरोली येथील जनसंपर्क कार्यालयाचे, खरेदी-विक्री संघाच्या पेट्रोल पंपावरील सहकारमहर्षी साहेबराव सातकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालय इमारतीचे भूमिपूजन व शेतकरी मेळावा खासदार पवार यांच्या उपस्थितीत पार पडला. महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या शेतकरी मेळाव्याला मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

शरद पवार म्हणाले, मोदी सरकारने शेतकरीहिताच्या विरोधात ३ कृषी कायदे करून ते अमलात आणले. या विरोधात देशभरात शेतकऱ्यांनी आंदोलने केली. ती दडपण्याचा प्रयत्न केला. मात्र, शेतकऱ्यांच्या एकजुटीपुढे हुकूमशाही सरकारला झुकावे लागले. हे जुलमी कायदे रद्द करावे लागले. जनशक्ती विरोधात गेलेल्या नेत्याला हुकूमशाही राज्य करता येत नाही. शेतकऱ्यांचे अर्थकारण सुधारले पाहिजे त्यासाठी केंद्रीय पातळीवर निर्णय होणे गरजेचे आहे. मात्र, हुकूमशाही सरकार शेतकरीविरोधी धोरण राबवित असल्याने प्रश्न सुटण्यास विलंब होत असल्याची टीकाही पवार यांनी यावेळी केली.

गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार दिलीप मोहिते, शिवसेना उपनेते शिवाजीराव आढळराव-पाटील, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, सभापती अरुण चौधरी, रमेश थोरात, प्रदीप गारटकर, हरिभाऊ सांडभोर, हिरामण सातकर, राजाराम लोखंडे यावेळी उपस्थित होते.

**दै. सामना**

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**